# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

अत्यंत तातडीचे

क्रमांक : ९७८८ ग-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : 28 JUN 2021 जुलै, २०२१

:: परिपत्रक ::

महाराष्ट्र विधानमंडळाचे **दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२१ सोमवार, दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी** पासून विधान भवन, मुंबई येथे सुरु होत आहे. **त्याअनुषंगाने आगामी अधिवेशनात पुढीलप्रमाणे सुरक्षा व्यवस्थाविषयक त्याचप्रमाणे, कोरोना विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या असून त्यानुसार देण्यात आलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.**

(१) **विधान भवन, मुंबई येथील मुख्य प्रवेशद्वाराजवळ शनिवार, रविवार दिनांक ३ व ४ जुलै, २०२१ रोजी पासून सकाळी ९.०० वा. ते सायंकाळी ६.०० वा. या वेळेत RT-PCR कोरोना चाचणी करुन घेण्यासंदर्भातील सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून अधिवेशन कालावधीत विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करणाऱ्या प्रत्येक मान्यवर व्यक्ती तसेच अधिकारी/ कर्मचारी यांनी ही चाचणी करुन घेणे आवश्यक आहे. अधिवेशनाकरीता उपस्थित राहणारे मान्यवर सर्व सन्माननिय सदस्य, विधानमंडळ अधिकारी / कर्मचारी, सदस्यांचे स्वीय सहाय्यक, सुरक्षा अधिकारी / कर्मचारी, वृत्त वाहिन्यांचे प्रतिनिधी, शासकीय अधिकारी / कर्मचारी, आणि इतर इत्यादींनी http://mls.org.in/covid-report/index.html या लिंक वर जाऊन तेथे देण्यात आलेल्या वर्गवारी नुसार नोंदणी करुन टोकन क्रमांक प्राप्त करुन घ्यावा. विधानभवन, मुंबई येथील मुख्य प्रवेशद्वारासमोर उभारण्यात आलेल्या कोरोना चाचणी केंद्र येथे जाऊन संबंधितांनी टोकन नंबर सांगून व स्वत:चे ओळखपत्र दाखवून कोरोना चाचणी करुन घ्यावी. त्यानंतर विधानभवन, मुंबई येथील मुख्य प्रवेशद्वार येथे करण्यात आलेल्या व्यवस्थेच्या ठिकाणी संबंधितांना त्यांचे कोरोना चाचणीचे अहवाल उपलब्ध करुन देण्यात येतील.ज्यांचे चाचणी अहवाल Negative असतील अश्या व्यक्तींनाच विधान भवन येथे प्रवेश देण्यात येईल. विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करताना सामाजिक अंतर राखणे सोईचे व्हावे यासाठी सर्व मान्यवर व्यक्ती तसेच, अधिकारी/कर्मचारी यांनी नियोजित वेळेपूर्वी उपस्थित राहणे आवश्यक राहील.**

(२) **विधान भवनाचे आवारात कोणत्याही मान्यवरांना/अभ्यागतांना शासकीय वा अशासकीय वाहनाने प्रवेश करता येणार नाही.**

(३) **विधान भवनाच्या गेट क्रमांक-१ जवळील मोकळ्या जागेत नेमून दिलेल्या ठिकाणावरच सर्व वाहने थांबविण्यात येतील व तेथून मान्यवरांना विधान भवन परिसरात व विधान भवनाच्या मुख्य पोर्चमध्ये चालत प्रवेश करावा लागेल.**

विधान भवन परिसरात सर्व मान्यवरांच्या वाहनांची मुख्य प्रवेशद्वाराजवळील मोकळ्या प्रांगणात पार्किंगची व्यवस्था (वाहनतळ व्यवस्था) खालीलप्रमाणे केलेली आहे.

पी-१ : **मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभा, मा.सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

पी-२ : **मा.मंत्री, मा.राज्यमंत्री, मा.मुख्य सचिव, अतिरिक्त मुख्य सचिव, मा.पीठासीन अधिकाऱ्यांचे सचिव, मंत्रालयीन प्रधान सचिव व सचिव तसेच विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी.**

पी-३ : **मुख्य सुरक्षा अधिकारी, वरिष्ठ पोलीस अधिकारी, वृत्तपत्र व दूरचित्रवाहिन्यांचे प्रतिनिधी.**

पी-४ : **महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे सर्व सदस्य (युनियन बँकेसमोरील मोकळी जागा).**

(४) विधान भवनात प्रवेश करताना गेट क्रमांक-१ मधून प्रवेश करण्याची व गेट क्रमांक-२ मधून बाहेर जाण्याची व्यवस्था केली आहे. त्याठिकाणी वाहन बोलविण्याची व्यवस्था (Car Calling System) करण्यात आली आहे.

(५) **मा.सदस्यांनी त्यांना 'विधानमंडळ सदस्य' म्हणून दिलेला बॅज सहजरित्या दिसेल अशा ठिकाणी लावावा.**

(६) अधिवेशन कालावधीत विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करताना सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व संबंधितांनी ओळखपत्र/प्रवेशपास दर्शनी भागावर दिसेल अशाप्रकारे लावणे आवश्यक आहे.

(७) विधान भवन मुख्य प्रवेशद्वार (गेट क्रमांक-१) च्या उजव्या बाजूस तसेच, मागील प्रवेशद्वारावर वैयक्तिक सुरक्षा तपासणीसाठी एक्स-रे बॅगेज तपासणी यंत्रणा स्थापित करण्यात आली आहे. अधिवेशन कालावधीत विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करताना कोविड विषयक पडताळणी व सुरक्षा तपासणी पूर्ण झाल्यानंतर विधानभवन इमारतीत प्रवेश देण्यात येईल.

(८) मा.मुख्यमंत्री/मा.उपमुख्यमंत्री/मा.मंत्री/मा.राज्यमंत्री/मा.विधानमंडळ सदस्य तसेच, विभागाचे प्रधान सचिव, सचिव व वार्ताहर यांच्या वाहनासाठी प्रवेशपत्रिका 'ग-१' कक्षाकडून घेऊन त्या वाहनावर स्पष्ट दिसतील अशा लावण्यात याव्यात. सदर प्रवेशपत्रिका असलेल्या वाहनांनाच सुरक्षा विभागाने तपासणी केल्यानंतर विधान भवनासमोरील मोकळ्या परिसरात प्रवेश दिला जाईल.

(९) विधान भवनाच्या मुख्य प्रवेशद्वारातून फक्त खालील व्यक्तींना प्रवेश देण्यात येईल.

(१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा.

(२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

(३) मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

(४) मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद.

(५) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा.

(६) दोन्ही सभागृहांचे मा.विरोधी पक्षनेते,

(७) राज्य मंत्रीमंडळातील मा.मंत्री/राज्यमंत्री.

(८) दोन्ही सभागृहांचे सर्व सन्माननीय सदस्य.

(९) दैनिक वृत्तपत्रांचे व दूरचित्रवाहिन्यांचे संपादक व प्रतिनिधी. (निश्चित केलेल्या संख्येमध्ये)

(१०) विधानमंडळाचे सचिव व इतर अधिकारी/कर्मचारी.

(११) मा.पीठासीन अधिकाऱ्यांचे सचिव, मा.उप पीठासीन अधिकारी/दोन्ही सभागृहांचे मा.विरोधी पक्षनेते यांचे खाजगी सचिव, विशेष कार्य अधिकारी, जनसंपर्क अधिकारी व विधानमंडळाचे कर्मचारी

(१२) मा.मंत्री/राज्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव किंवा एक विशेष कार्य अधिकारी किंवा स्वीय सहायक व दोन शिपाई.

(१३) मा.मुख्य सचिव/अतिरिक्त मुख्य सचिव, मंत्रालयीन विभागाचे प्रधान सचिव, सचिव, सह सचिव, उप सचिव व संबंधित विभागाचे विभाग प्रमुख व संचालक पदाच्या दर्जाचे वरिष्ठ अधिकारी.

(१४) मा.पोलिस महासंचालक, मा.पोलिस आयुक्त, मुंबई व वरिष्ठ पोलिस अधिकारी

(१०) विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करताना स्वत:चे ओळखपत्र तसेच विधानमंडळ सचिवालयाने दिलेल्या अधिकृत प्रवेशपत्रिकेवर छायाचित्र असल्यानंतरच विधान भवनात प्रवेश मिळेल. तसेच, प्रवेशपत्रिका घेवून विधानभवन इमारतीत अथवा परिसरात संबंधित प्रवेशपत्रिका धारकाने काही अनूचित प्रकार केल्यास अशा व्यक्तीचा प्रवेश पास जमा करुन त्यांना विधान भवन इमारतीच्या बाहेर काढण्यात येईल.